# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

(शिक्षण विभाग)

जा.क्र.१४२७/शि.वि.(प्रा.)/२०१३ दि.३०/१२/२०१३

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- शिष्यवृत्ती परीक्षा दि.१६ मार्च २०१४ करीता आवेदन केलेल्या परिक्षार्थींची यादी तपासणीबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, आपल्या शाळेतून शिष्यवृत्ती परीक्षा दि. १६ मार्च २०१४ करीता आवेदन पत्रे भरण्यात आलेली इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांची परीक्षा क्रमांकाची **यादी** कार्यालयास प्राप्त झालेली असून यादीतील इतर सर्व माहिती अचूक असल्याबाबत आपणाकडून लेखी प्रमाणपत्र यादीवर लिहावयाचे आहे. याकरीता आपण शिष्यवृत्ती परिक्षा-२०१४ करीता आवेदन पत्र भरलेल्या विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव, आईचे नाव, दाखल क्र., जन्मतारीख, माध्यम, जात, लिंग, शाळेचा यु-डायस क्रमांक, इ. माहिती असलेली **प्रपत्र 'अ' ची** शाळा प्रत तसेच शिष्यवृत्ती परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांचे **दाखल खारीज रजिस्टर, लाल शाईचा पेन, मुख्याध्यापक शिक्का,** इ. साहित्यानिशी खाली नमुद यादी तपासणी केंद्रावर दिलेल्या तारखेला दिलेल्या वेळेवर उपस्थित राहावे. यादी तपासून झाल्यावर एक प्रत शाळेकरीता देण्यात येईल. ती परीक्षेपर्यंत जपून ठेवावी.

| तालुका क्र. | यादी तपासणी केंद्राचे नाव | दिनांक | माध्यम | वेळ |
|---|---|---|---|---|
| ७१४१, या शिष्यवृत्ती शाळा संकेतांकानी सुरू होणाऱ्या शाळा | डॉ.राममनोहर लोहिया माध्य. शाळा, मनपा, नागपूर | दि.०२.०१.२०१४<br>दि.०३.०१.२०१४ | हिंदी व उर्दू<br>मराठी | ११ ते ३<br>११ ते ३ |
| ७१४२, या शिष्यवृत्ती शाळा संकेतांकानी सुरू होणाऱ्या शाळा | वाल्मिकीनगर माध्य. शाळा, मनपा, नागपूर | दि.०२.०१.२०१४<br>दि.०३.०१.२०१४ | हिंदी व उर्दू<br>मराठी | ११ ते ३<br>११ ते ३ |
| ७१४३, या शिष्यवृत्ती शाळा संकेतांकानी सुरू होणाऱ्या शाळा | नवि शुक्रवारी हिंदी उच्च प्राथ. शाळा | दि.०२.०१.२०१४ | हिंदी व उर्दू<br>मराठी | ११ ते २<br>२ ते ४ |
| ७१४४, या शिष्यवृत्ती शाळा संकेतांकानी सुरू होणाऱ्या शाळा | दुर्गानगर माध्य. शाळा, मनपा, नागपूर | दि.०२.०१.२०१४ | हिंदी व उर्दू<br>मराठी | ११ ते २<br>२ ते ४ |
| ७१४५, या शिष्यवृत्ती शाळा संकेतांकानी सुरू होणाऱ्या शाळा | बाळाभाऊपेठ हिंदी/मराठी उ.प्रा.शा. | दि.०२.०१.२०१४<br>दि.०२.०१.२०१४<br>दि.०३.०१.२०१४ | उर्दू<br>हिंदी<br>मराठी | ११ ते २<br>२ ते ४<br>११ ते २ |

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.